

# कलस्सैकरांस २:१४-१७ ला आदर देणे

एड्रियन एबन्स
दनुतसोन ब्राउन

# कलस्सैकरांस २:१४-१७
# ला आदर देणे

एड्रियन एबेन्स
आणि डानुतासन ब्राउन

Printed by

MARANATHA
MEDIA

Maranathamedia.com

**November, 2025**

पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई सुनीता मोहिते ह्यांनी मदत केली आहे.

# अनुक्रमणिका

केवळ सणाच्या दिवशी शब्बाथ?....................................................................4
पौल ग्नॉस्टिसिझमविरुद्ध लिहितो....................................................................6
निर्माता आणि त्याच्या सृष्टीविरुद्ध ग्नॉस्टिसिझम..............................................9
हुकुमनामानुसार हस्तलेखन नष्ट करणे..........................................................13
नियमशास्त्र आपल्या फायद्यासाठी देण्यात आले...............................................16
आपल्या आज्ञांमुळे मळीन झालेले..................................................................22
निर्मात्याचा त्याच्या निर्मितीशी समेट..............................................................25
प्रभूभोजनात सहभागी होणे चुकीचे नाही...........................................................26
कलस्सैकरांस २:१६–१७ ची पुनर्मांडणी...............................................................28

# केवळ सणाच्या दिवशी शब्बाथ?

“तर मग खाण्यापिण्याविषयी, तसेच सण, अमावस्या किंवा शब्बाथ पाळण्याविषयी कोणाला तुमचा निर्णय करू देऊ नका. ह्या बाबी पुढे होणाऱ्या गोष्टींच्या छाया आहेत; शरीर तर ख्रिस्ताचे आहे.” कलस्सैकर २:१६–१७.

हा उतारा आजच्या ख्रिस्ती जगात सर्वाधिक संबोधला जाणारा विषयांपैकी एक आहे. येथे पौल खरेतर काय सांगू इच्छितो? पौल काय देवाच्या लोकांच्या सभांबद्दल (ज्या नियमशास्त्राच्या पुस्तकात दिल्या आहेत) असे म्हणतो का की त्या आता निरुपयोगी झाल्या आहेत आणि केवळ कायदेशीर बंधनांचे ओझे आहेत? किंवा पौल विश्वासणाऱ्यांना असे सांगतो आहे का की जगातले लोक तुम्हाला या गोष्टींबद्दल न्यायात धरू नयेत परंतु तुम्ही एकमेकांना मात्र धरू शकता? किंवा पौल या यादीत ‘सब्बातोन’ हा शब्द वापरतो म्हणून सातव्या दिवसाचा शब्बाथ आता ख्रिस्ती लोकंसाठी असंबंधित झाला आहे असे सुचवतो का?

परंपरागत ॲडव्हेंटिस्ट दृष्टिकोण जे ७वा-दिवस शब्बाथ ‘सावली’ आहे हे मान्य करू इच्छित नाही असे स्पष्ट करतो की येथे ‘शब्बाथ म्हणजे वार्षिक उत्सवांमधील शब्बाथ (सब्बातोन) आहे. प्रायश्चित्त-दिनी ‘सब्बातोन’ हा शब्द वापरला जातो, परंतु इतर कोणत्याही वार्षिक उत्सवात नाही. मग पौल येथे हेच म्हणू इच्छितो का? बहुतेक रविवारच्या ख्रिस्ती लोकांसाठी हे स्पष्टीकरण वरवरचे वाटते. आपण पाहू की शब्बाथाचे समर्थन करण्याचा याहून चांगला मार्ग आहे आणि हा मार्ग शब्बाथाला सावली न ठरवता त्याचा सन्मान राखतो. परंतु त्यासाठी या यादीतील इतर दोन घटक नवीनचंद्र आणि सण-दिवस नव्या कराराच्या काळात अधिक महत्त्वाचे आहेत हे मान्य करावे लागेल.

‘सब्बातोन’ [G4521] हा शब्द नव्या करारात एकूण ६८ वेळा येतो. यापैकी ५९ ठिकाणी तो थेट ७व्या दिवसाच्या शब्बाथासाठी वापरला आहे. ८ ठिकाणी तो

७व्या दिवसाच्या शब्बाथाशी जोडलेल्या आठवड्यासाठी वापरला आहे. म्हणजे ६८ पैकी ६७ ठिकाणी हा शब्द थेट ७वा-दिवस शब्बाथाशी संबंधित आहे. उरलेला एकमेव संदर्भ म्हणजे कलस्सैकर २:१६. जर नवा करार हा शब्द ६७ वेळा सातव्या दिवसाच्या शब्बाथासाठीच वापरतो, तर केवळ या एका वचनात त्याचा अर्थ पूर्णपणे वेगळा घेणे योग्य ठरेल काय? हेही लक्षात घ्यावे की पौल ज्या 'शब्बाथा' शब्दाचा वापर करतो तोच शब्द जुन्या कराराच्या ग्रीक अनुवादात (LXX) चौथ्या आज्ञेतल्या शब्बाथासाठी वापरला आहे.

पौलने दिलेल्या यादीविषयी आपली उत्सुकता आणखी वाढवणारी एक गोष्ट म्हणजे जुन्या करारात सण, नवीनचंद्र आणि शब्बाथ याबद्दल दिसणारा पुढील क्रम:

तसेच शब्बाथाच्या [H7676] व चंद्रदर्शनाच्या [H2320] दिवशी व नेमलेल्या पर्वणीस [H4150] ठरवलेल्या संख्येप्रमाणे नेहमी परमेश्वरासमोर उभे राहून सर्व होमबली त्यांना त्यास अर्पावे लागत. १ इतिहास २३:३१

हा क्रम २ इतिहास २:४; ८:१३; ३१:३; नहेम्या १०:३३; यहेज्केल ४५:१७; होशेय २:११ येथेही आढळतो. या सर्वच ठिकाणी "शब्बाथ" म्हणजे सातव्या दिवसाचा शब्बाथ आहे. यहेज्केल ४५:१७ मध्ये अगदी हाच क्रम दिलेला आहे आणि त्यात मांस-अर्पण आणि पेयाअर्पणबद्दलही सूचक संदर्भ असू शकतात:

"उत्सव, चंद्रदर्शने, शब्बाथ व इस्राएल घराण्याचे सर्व सण ह्यांत होमार्पण, अन्नार्पण व पेयार्पण ह्यांची तरतूद करणे हे अधिपतींचे काम आहे; इस्राएल घराण्यासाठी प्रायश्चित्त करावे म्हणून त्याने पापार्पण, अन्नार्पण, होमार्पण व शांत्यर्पणे ही सिद्ध करावीत." यहेज्केल ४५:१७

LXX मध्ये 'सण' [G1859], 'नवीनचंद्र' [G3561] आणि 'शब्बाथ' [G4521] यासाठी वापरलेले शब्द अगदी तेच आहेत जे पौल कलस्सैकर २:१६ मध्ये विदित करतो. जर जुन्या करारातील सर्व हे उतारे हा क्रम सातव्या दिवसाच्या

शब्बाथासाठीच वापरत असतील, तर पौल त्याच क्रमाचा उपयोग पूर्णपणे वेगळ्या अर्थाने करेल असे का मानावे? त्याच्या काळातील शास्त्रांमध्ये जसा वापर आहे, त्यापेक्षा भिन्न अर्थ तो अचानक का लावेल? तो ‘सब्बातोन’ हा शब्द असा अर्थ देण्यासाठी का वापरेल जो बायबलमध्ये कुठेही वापरलेला नाही जोवर आपण असे मानत नाही की तो केवळ प्रायश्चित्त-दिवसाविषयी (लेवीय २३:३२) बोलत आहे?

खरंच जर पौल कलस्सैकर २:१६ मध्ये सातव्या दिवसाचा शब्बाथाच अभिप्रेत ठेवत असेल, तर शब्बाथ “येणाऱ्या गोष्टींची छाया” म्हणून सूचीबद्ध होईल. परंतु प्रेरणा शब्बाथाबद्दल अगदी स्पष्टपणे वेगळे सांगते:

“शब्बाथ आदामाला सोपविण्यात आला, जो संपूर्ण मानवकुळाचा पिता आणि प्रतिनिधी होता. त्याचे पालन करणे म्हणजे पृथ्वीवर राहणाऱ्या सर्वांनी कृतज्ञतेची कबुली देण्याची एक कृती होती की देव त्यांचा निर्माणकर्ता आणि त्यांचा योग्य सार्वभौम आहे; ते त्याच्या हाताची निर्मिती आहेत आणि त्याच्या अधिकाराचे विषय आहेत. त्यामुळे ही व्यवस्था पूर्णपणे स्मरणार्थ देण्यात आली होती, आणि सर्व मानवजातीसाठी देण्यात आलेली होती. त्यात काहीच असे नव्हते जे ‘छायाप्रकार’ किंवा केवळ विशिष्ट लोकांसाठी मर्यादित असेल.” (Patriarchs and Prophets, पृ. ४८)

आता आपल्या समोर एक मनोरंजक प्रश्न उभा राहतो. पौलने ‘शब्बाथ’ हा शब्द ज्या यादीसह वापरला आहे, त्याचा केवळ बायबलमधील वापर पाहिला, तर त्याचा अर्थ सातव्या दिवसाचा शब्बाथ असा होतो. जर खरोखरच पौल सातव्या दिवसाच्या शब्बाथाचे अभिप्रेत ठेवत असेल, तर मग असे दिसते की शब्बाथ हा “येणाऱ्या गोष्टींची छाया” ठरतो. आपण स्वतःला कदाचित हे पटवू शकू की शब्बाथ भविष्यातील विश्रांतीच्या समृदधीचा काळाकडे आणि स्वर्गातील आपल्या भावी मेळाव्याकडे निर्देश करतो परंतु ती भविष्याची छाया नव्हे; ती तर भविष्याचा स्वाद किंवा झलक ठरेल. याशिवाय, हे मत “प्रेरित लेखनांशी (Spirit

of Prophecy) विसंगत ठरेल, कारण ते अत्यंत स्पष्टपणे सांगते की शब्बाथात "काहीही छायाप्रकाराचे" नव्हते. एलेन व्हाईटने "मर्यादित उपयोग" नसल्याचे जे सुचवले आहे, ते दाखवते की जगाच्या इतिहासभर शब्बाथामध्ये काहीही "छायावादी" नव्हते.

वरील दोन्ही पुरावे आपण स्वीकारले, तर आपण जणू अत्यंत अवघड परिस्थितीत सापडतो. मी स्वतःही बराच काळ ह्याच संघर्षात होतो; आणि या गोंधळाचे उत्तर मिळावे म्हणून मी प्रार्थनेत प्रभूस मागितले. आपला पिता आपली प्रार्थना ऐकतो हे मला ठाऊक आहे, आणि एका शब्बाथाच्या सकाळी मला जाग आली तेव्हा, माझ्या मनात एकामागून एक विचारांची लाट उभी राहिली आणि मला वाटते की हे विचार या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतील.

## पौल ग्नॉस्टिसिझमविरुद्ध लिहितो

मी मनात या प्रश्नावर सतत विचार-चिंतन करत होतो, आणि तेव्हा मला ते उतारे आठवले ज्यांत ग्नॉस्टिक ख्रिस्ती शिकवणी स्पष्टपणे सूचित होताना दिसतात:

"ख्रिस्ताप्रमाणे नसलेले, तर माणसांच्या संप्रदायाप्रमाणे, जगाच्या प्राथमिक शिक्षणाप्रमाणे असलेले तत्त्वज्ञान व पोकळ भुलथापा ह्यांच्या योगाने तुम्हांला कोणी ताब्यात घेऊन जाऊ नये म्हणून लक्ष द्या;" कलस्सै २:८

आपण मोशेच्या नियमशास्त्राला तत्त्वज्ञान किंवा मनुष्यांच्या चालीरिती असे म्हणू शकतो का?

मोशेने परमेश्वराचे शब्द लोकांनी चुकीच्या रीतीने समजावेत किंवा चुकीच्या

रीतीने लागू करावेत अशी परिस्थिती कधीही राहू दिली नाही. “त्याने परमेश्वराचे सर्व शब्द पुस्तकात लिहून ठेवले, जेणेकरून ते नंतर पाहता येतील. डोंगरावर ख्रिस्ताने स्वतः त्याला जसे सांगितले तसेच त्याने ते लिहून ठेवले.” (1MR 114)

ख्रिस्त स्वयंपणे मोशेला हे शब्द सांगत होता. मग आपण मोशेचे नियमशास्त्र “मनुष्यांच्या चालीरिती” किंवा “जगाची मूलतत्त्वे” असे म्हणूच शकत नाही.

परंतु हा उतारा ख्रिस्ती मंडळीत ग्नॉस्टिक शिकवणी घुसत असल्याबद्दल बोलत आहे, असे मात्र निश्चितपणे मानता येते. ग्नॉस्टिसिझमच्या काही मुख्य शिकवणी कोणत्या होत्या?

- भौतिक जग वाईट आहे; आत्मिक जग चांगले आहे. भौतिक जग दुष्ट, अज्ञान किंवा शून्यतेच्या अधीन आहे.
- दैवी ठिणगी काही (सर्व नव्हे) मनुष्यात अडकलेली आहे, आणि भौतिक जगातील इतर सर्व वस्तूंहून निराळी तीच मुक्तीयोग्य आहे.
- तारण “गुप्त ज्ञानात” आहे ज्याद्वारे मनुष्य आपल्या स्वतःबद्दल, आपल्या उत्पत्तीबद्दल आणि आपल्या नियतिबद्दल जाणतो.
- एक चांगला देव वाईट जग निर्माण करू शकत नसल्यामुळे, ते एखाद्या कनिष्ठ, अज्ञानी किंवा वाईट देवाने निर्माण केले असावे. सहसा दिलेले स्पष्टीकरण असे आहे की खऱ्या, चांगल्या देवाने इतर आर्चन्स निर्माण करणारे किंवा त्यांना निर्माण करण्यासाठी एकत्रित केलेले प्राणी निर्माण केले. सोफिया (विजडम) च्या एका अपघातामुळे दुष्ट आर्चन्सची निर्मिती झाली ज्याने आपले जग निर्माण केले आणि देव असल्याचे भासवले. तो मानवांपासून सत्य लपवतो, परंतु काही मानवांमध्ये सोफियाच्या ठिणग्या त्यांना प्लेरोमा (दैवी क्षेत्रात) परत जाण्याची इच्छा निर्माण करतात जिथे ते आहेत.

या कल्पना जुन्या कराराशी आणि प्रेरितांच्या लेखांशी भिडणाऱ्या असल्याने, प्रारंभीच्या ख्रिस्ती मंडळीने त्या स्पष्टपणे नाकारल्या.

ग्नॉस्टिसिझमचे काही परिणाम काय होते?

ग्नॉस्टिक लोक भौतिक वस्तू भ्रष्ट आहेत असे मानत असल्यामुळे ते मानवी शरीरही भ्रष्ट आहे असे मानत. परिणामी, काही ग्नॉस्टिकांचा कल असा होता की शरीर तर पूर्णपणे भ्रष्ट आहे आणि त्याचे उद्धार होऊ शकत नाही, म्हणून देहाच्या वासनांची पूर्ती करण्यात काही हानी नाही. दुसऱ्या प्रकारचे बहुधा बहुसंख्य ग्नॉस्टिक असे मानत की शरीराला कठोर संयमाने आवर घालणे आवश्यक आहे. कोणताही पर्याय घ्या योजना अ किंवा योजना ब पण या दोन्हींच्या पायाभूत तत्त्वामुळे देव खरोखर देह धारण करून माणूस कसा होऊ शकतो? हा खरा ख्रिस्त-देहधारणेचा सिद्धांत समजणे अशक्य बनते. (संदर्भ: www.christianity.com)

या कल्पनांपैकी अनेक हळूहळू ख्रिस्ती धर्माच्या काही भागांत शिरू लागल्या. पौलच्या काळात हा प्रभाव वाढत होता, जरी पूर्ण विकसित ग्नॉस्टिक ख्रिस्ती धर्म २ऱ्या शतकातच दिसतो. तरीही आपण नव्या करारात पाहतो की प्रेरित ह्या विचारांच्या प्रारंभीच्या रूपांशी आधीपासूनच झगडत होते.

“हे तीमथ्या, तुझ्या स्वाधीन केलेली ठेव सांभाळ; अधर्माच्या रिकाम्या वटवटींपासून आणि जिला विद्या हे नाव चुकीने दिले गेले आहे तिच्या विरोधी मतांपासून दूर राहा.” १ तीमथ्य ६:२०

या वचनातील “विद्या” हा शब्द प्रत्यक्षात ग्रीक ग्नोसिस आहे ज्यापासून Gnostic हा शब्द आला आहे. पौल तीमथ्यास खोट्या ग्नोसिसपासून म्हणजेच ग्नॉस्टिक कल्पनांपासून सावध करीत आहे.

वर म्हटल्याप्रमाणे, भौतिक जग वाईट आहे या ग्नॉस्टिक कल्पनेमुळे त्यांनी खऱ्या सिद्धांताचा की ख्रिस्त देहधारण करून आला ह्याचा दृढ नकार केला. म्हणूनच पौल स्पष्टपणे म्हणतो:

“कारण ख्रिस्ताच्या ठायीच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान वसते,” कलस्सै २:९

प्रेषीत योहानही या शिकवणीला प्रत्युत्तर देतो आणि तिला ख्रिस्तविरोधीचा आत्मा असे संबोधतो:

“आणि जो जो आत्मा देह धरून आलेल्या येशू ख्रिस्ताला कबूल करत नाही, तो तो देवापासून नाही. हाच ख्रिस्तविरोधकाचा आत्मा आहे; तो येणार हे तुम्ही ऐकले आहे आणि तो जगात आताही आहे.” १ योहान ४:३

ख्रिस्त हा दैवताचा परिपूर्णत्व देहधारण करून आला आहे पौलने केलेले हे विधान ग्नॉस्टिकांसाठी प्रत्यक्षात कफर्/अपवित्रता ठरले असते. आणि हेच आणखी एक स्पष्ट पुरावा देते की पौल येथे ग्नॉस्टिक शिकवणीला उद्देशून लिहित आहे.

## निर्माता आणि त्याच्या सृष्टीविरुद्ध ग्नॉस्टिसिझम

ख्रिस्त देहधारण करून आला मग तो कोणत्या स्वभावात आला? हा प्रश्न मागील दोन हजार वर्षांपासून मतभेदाचा विषय ठरला आहे. आणि याचे एक कारण असे आहे की ग्नॉस्टिसिझममधील काही तत्त्वे आजही आपली बायबल समजण्याची क्षमता प्रभावित करतात. ग्नॉस्टिसिझम मानवाला देवाबद्दल असलेला एक जुना प्रश्न स्पष्ट शब्दांत मांडतो की आपण ज्या संकटात आहोत त्याला देवच जबाबदार आहे, कारण त्याने असे जग निर्माण केले ज्यात आपण पाप करणार आहोत आणि दुःख व मृत्यूमध्ये पडणार आहोत, हे त्याला पूर्वीच माहीत होते. ग्नॉस्टिकांच्या मते भूक, हिंसा, रोगराई यांनी भरलेले हे भौतिक जग एका दुष्ट देवतेची निर्मिती आहे. या विश्वासाच्या अनेक रूपे आहेत, परंतु एक मत असे आहे की निर्मितीच पडलेली आणि वाईट आहे, त्यामुळे येशू ती स्वतःवर घेऊ शकत नाही. मनुष्याचा देवाशी मेळ घालण्यासाठी या मानवी

प्रवृत्तीशी जी आपल्या निर्माणकर्त्याबद्दल नकारात्मक विचार करते त्याला तोंड द्यावे लागते.

हे स्पष्ट करण्यासाठी आपण "ख्रिस्तविरोधीचा आत्मा" या ॲलन नाईट लिखित पुस्तकातील एक उतारा पाहू, ज्यात बाबेल धर्म ग्रीक विचारसरणीत कसा विकसित झाला आणि मग ख्रिश्चन धर्मात कसा शिरला, हे सांगितले आहे:

“बाबेलच्या या दुसऱ्या लाटेच्या धर्मत्यागाने यहूदी विश्वासात आणलेला सर्वात मोठा बदल म्हणजे निर्मिती आणि भौतिक जगाबद्दलची नवी भूमिका... या महान सुधाराने बाबेल धर्मत्यागाचे केंद्र या जगातील भौतिक यशापासून बदलून पलीकडच्या जगातील आध्यात्मिक यशाकडे नेले. (टीप: या जगाची परिस्थिती अधिकच वाईट होत जाईल तसा हाच बदल पुन्हा दिसेल.) बाबेलच्या धर्मत्यागाने आता अमर आत्म्याचा आणि मृत्यूनंतर स्वर्गात परत जाण्याच्या त्याच्या नियतीचा प्रसार करायला सुरुवात केली. त्यामुळे सर्वोच्च देवता पलीकडच्या जगाशीच संबंधित मानला जाऊ लागला. जर सर्वोच्च देवता परिपूर्ण आहे, असे मानले, तर तो या भौतिक जगाची संघर्ष, मर्यादा आणि दोषांनी भरलेली निर्मिती कशी करेल? या बदलामुळे भौतिक जगाची निर्मिती अनेकदा दुय्यम, किंबहुना नकारात्मक घटना मानली जाऊ लागली."

ग्रीक लोकांनी हा प्रश्न असा सोडविला की निर्मितीचे कार्य त्यांनी अर्ज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या द्वितीय, कनिष्ठ देवताकडे दिले. आणि हेल्लेनिस्टिक यहुदींनी या ग्रीक कल्पना पहिल्या शतकात ख्रिश्चन धर्मात आणल्यावर, त्याचा परिणाम हिब्रू धर्माविरुद्ध तीव्र विरोधरूपाने झाला.

चर्चच्या आत, काही ख्रिस्ती लोकांनी हिब्रू सृष्टीकर्त्या देवाची ओळखच ग्रीक डेमी-अर्जशी करून दिली. अशा रीतीने ख्रिस्ती धर्मातील पहिली मोठी विधर्म चळवळ जन्माला आली, जी ग्नॉस्टिक ख्रिस्ती म्हणून ओळखली जाते. ग्नॉस्टिकांच्या मते, खरा सर्वोच्च देव हे उत्पत्ती पुस्तकात वर्णन केलेला देव नाही. खरा सर्वोच्च देव तर नव्या करारात प्रकट झालेला स्वर्गीय पिता आहे एक

पूर्णपणे वेगळा व्यक्ती.

आणि म्हणून, त्यांचा तर्क असा होता की ख्रिस्ती लोकांनी हिब्रू देवाचा आणि त्याच्या निर्मितीचा पूर्णपणे त्याग करायला हवा. कारण तेव्हाच ख्रिस्ती लोक खात्री बाळगू शकतील की त्यांचा अमर आत्मा हिब्रू देवाने निर्माण केलेल्या या भौतिक जगात पुन्हा पुनर्जन्माला येणार नाही, आणि मृत्यूनंतर स्वर्गात जाईल.

शेवटी यामुळे ग्नॉस्टिक ख्रिस्ती लोकांनी हिब्रू सृष्टीकर्त्याला एक अविवेकी आणि दुष्ट देवता म्हणून दोष दिला जो मानवाला भौतिक अस्तित्वाच्या बंधनात ठेवू इच्छितो. याहूनही भयंकर म्हणजे, त्यांच्या मते, त्या सृष्टीकर्त्याने सातव्या दिवशी उपासना स्थापन केली भौतिक निर्मितीच्या सन्मानार्थ...

निर्मात्याविरुद्धची अशी शत्रुत्व भावना एदेनच्या बागेतल्या पतनातूनच निर्माण झाली. आपल्याला आठवते की हव्वा सर्पाने फसवली जाऊन निषिद्ध फळ खाताच, आदमाने तिच्यासाठी विनंती केली नाही. तो तिच्या बाजूने उभा राहिला नाही. त्याने तिला देवाकडे क्षमा मागण्याचा सल्लाही दिला नाही. त्याऐवजी त्याला वाटले की देवाने त्याला एका भयंकर परिस्थितीत अडकविले आहे. देवाने निषिद्ध झाड का निर्माण केले? फसवणारा का ठेवला? आणि मग देवाने त्याला अशी स्त्री का दिली जिच्यावर तो प्रेम करील, जिच्याशी तो जोडला जाईल आणि जी नंतर निषिद्ध फळ खाईल? या सर्व गोष्टींमुळे तो कोपर्यात सापडल्यासारखा वाटू लागला, आणि म्हणून त्याच्या मनात बंडाचा उद्रेक झाला.

आदमाने निषिद्ध फळ खाण्याचा निर्णय घेतला देवाच्या इच्छेबाहेर जाणे हे त्याला पूर्णपणे माहीत होते. आणि त्या क्षणीच त्याने आपल्या पित्यासोबतच्या पुत्रत्वाची जाणीव गमावली, ज्यामुळे लगेचच लज्जा आणि अपराधभाव त्याच्या मनात उमटले. या नवीन आणि वेदनादायक भावनांशी सामना करण्यासाठी आदमाने देवावर दोष ठेवला. त्याला वाटले, जर देव चांगला असेल, तर अशा घटना घडतील असे जग तो का निर्माण करेल? ज्यात शेवटी मला फळ खावे लागेल? किंवा जर देव खरोखर चांगला असेल, तर त्याने मला क्षमा करायला हवे

जरी मी पश्चात्ताप केलेला नाही आणि माझ्या स्वतःच्या हृदयात झालेला भयंकर बदल मला अजून जाणवलेलाच नाही.

आदमाला हे समजले नाही की मृत्यू हि देवाची शिक्षा नव्हती, तर आज्ञाभंगाचा स्वाभाविक परिणाम होता देवापासून स्वतःला तोडून टाकण्याचा आपोआप होणारा परिणाम. त्याने सैतानाचे खोटे मानले होते: "तुम्ही खचित मरणार नाही." उत्पत्ती ३:४ त्यामुळे त्याच्या मनात फळ विष नव्हते देवाची मर्यादाच त्याला विषासारखी वाटत होती. सैतानाने असेही म्हटले होते:

"कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल." उत्पत्ती ३:५

आदमाला वाटले की देव त्याच्यापासून काही चांगली गोष्ट लपवून ठेवत आहे, वाईट नव्हे. जर फळ खाल्ल्यावर मरण नैसर्गिक परिणामाने येत नसेल (उदा. आपण श्वास घेणे थांबवले तर आपण मरतो), तर मग मरण देवाकडून थेट शिक्षेच्या रूपाने यायला हवे (उदा. आपण श्वास घेत नाही, म्हणून देव आपल्याला मारतो). आदमाला वाटले की देव त्याच्या पत्नीला मारणार आहे, आणि त्याला तिच्यासोबत मरण्याचा निर्धार झाला त्यामुळे त्यानेही फळ खाल्ले. परंतु त्याचे ते धाडस पापामुळे निर्माण झालेल्या स्वार्थी स्वभावापुढे ताबडतोब नाहीसे झाले. आणि मग त्याने असा तर्क लावला की जर देव त्यांना शिक्षा करणार असेल, तर देवाने आदमाला या संकटात ढकलल्याबद्दल हव्वेलाच शिक्षा देऊ नये काय? आणि कदाचित हव्वेला निर्माण केल्याबद्दल ख्रिस्तालाही शिक्षा द्यावी? बायबल सांगते:

"आदाम म्हणाला, "जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले." उत्पत्ती ३:१२

आदमाला असे वाटले की देवाने अशी व्यवस्था निर्माण केली आहे ज्या

व्यवस्थेत मृत्यूची मागणी करणारा देवच आहे. त्याला वाटले की देवाने असा मृत्यू फर्मान जारी केला आहे ज्यातून सुटण्याचा कोणताही मार्ग नाही. पण हे खरे होते काय? देवाने आदमाला काय सांगितले होते, ते आपण कसे समजून घ्यावे?

“ज्या दिवशी त्या झाडाचे फळ खाशील त्याच दिवशी तू नक्कीच मरशील.” उत्पत्ती २:१७ (IRVMAR)

ही शिक्षा देण्याची धमकी नव्हे, तर परिणाम काय होणार हे स्पष्ट करणारी घोषणा आहे. याची तुलना आपण श्वासोच्छ्वासाशी करू शकतो. “त्या दिवशी तू श्वास घेणे थांबवशील तेव्हा तू तू नक्कीच मरशील.” हे खरे आहे की आपण श्वास घेणे चांगले आहे असा विश्वास गमावून श्वास थांबवला तर आपण मरू. परंतु जर आपण पश्चात्ताप करून पुन्हा श्वास घेतला तर काय? आपण परत जिवंत राहणार नाही काय?

जर आदमाला आपली खरी समस्या जाणवली असती, तर त्याने क्षमा मागितली असती आणि देवाविषयीच्या आपल्या भयंकर विचारांपासून तो बरा झाला असता. पण आदमाला आता आपल्या प्रेमळ पित्यामध्ये कृपा, दया किंवा करुणा दिसत नव्हती. त्याला फक्त एक कठोर देव दिसत होता ज्यावर विश्वास ठेवता येत नाही ज्यापासून तो पळून लपला आणि भीतीने थरथरला. आदमाच्या डोळ्यांत देव फक्त असा एक “निर्माता” दिसत होता ज्याने अशी अट ठेवली की आदम अटळपणे अपयशी ठरणार होता. पित्याविरुद्ध आदमाने दिलेला हा दोषारोपात्मक निर्णय पौल पुढील शब्दांत मांडतो:

“आणि पाप केलेल्या एकाच (आदाम) मनुष्याच्या द्वारे जसा परिणाम झाला” रोमकर ५:१६

या वचनात पौल देव आदमावर दोष ठेवत आहे असे सांगत नाही. येशू म्हणतो: “पिता कोणाचाही न्याय करत नाही.” योहान ५:२२ आणि व्यभिचारिणी स्त्रीला

तो म्हणतो: “मीही तुला दोष देत नाही.” योहान ८:११ येशू असेही म्हणतो: “तुम्ही देहाप्रमाणे न्याय करता, परंतु मी कोणाचाही न्याय करीत नाही.” योहान ८:१५ म्हणजेच दोषारोप देवाकडून आले नाही. दोषारोप हा पापाचा आदमाच्या मनावर झालेला परिणाम होता. देवाने त्याला निर्दयपणे दोष दिला आहे असे वाटल्यामुळे आदमाने देवालाच दोष दिला. आदमाच्या या देवद्वेषाची कारणीभूत ठरलेली ही चूक देवाला दोष देणे त्याच्या संततीतही उतरली. आणि हेच दोषारोप आपल्यामध्ये आणि देवामध्ये निर्माण होणारा अंतराचा भिंत बनते.

“कारण देहस्वभावाचे चिंतन हे देवाबरोबर वैर आहे; ते देवाच्या नियमशास्त्राच्या अधीन नाही, आणि त्याला तसे होता येत नाही.” रोमकर ८:७

हा प्रश्न सोडवण्यासाठीच देवाने आपला पुत्र दिला की आपण देवाशी मेळ घालू. देवाने आपला पुत्र दिला, कारण त्याद्वारे तो आपल्याला दाखवू इच्छित होता की तो आपल्यावर प्रेम करतो आणि आपल्यासाठी सर्व काही करील. तो असा दोषारोप करणारा देव नाही की आपल्याला वाटते की तो नेहमी मृत्यूची मागणी करतो. देवापासून दूर झाल्यामुळे आपण असा विचार केला की देवाला आपल्या बाबतीत मृत्यूच अपेक्षित आहे. आणि मग आपण असे मानले की देवाने ही मागणी आपल्या पुत्रावर टाकली की आपल्या विरोधातील दोषारोपण संपुष्टात यावे. परंतु देवाने मानवजातीला त्याच्या पुत्राला मारू दिले आणि येशूने क्रूसावर स्वतःच्या मृत्यूसाठी पित्याला त्यांची क्षमा कर असे विनवले. आणि पुनरुत्थानाद्वारे देवाने दाखविले की आपल्या विरोधातील आपल्या वैरभावापेक्षा देवाचे प्रेम अधिक आहे. ख्रिस्ताच्या पित्यावरील विश्वासाने मानवजातीच्या देवाबद्दलच्या शंका आणि गैरसमजांवर विजय मिळविला आहे. आणि हा विश्वास ख्रिस्त आपल्यालाही देतो जेणेकरून देवाबद्दल असलेल्या आपल्या स्वतःचा नाश करणाऱ्या विचारांपासून आपण बरे होऊ.

“म्हणून ख्रिस्त येशूमध्ये असलेल्यांना दंडाज्ञा नाहीच. [ते देहाप्रमाणे नाही तर

आत्म्याप्रमाणे चालतात.]” रोमकर ८:१

हीच ती तारणयोजना होती जी देवाने आदमाच्या पापानंतर त्याच्यासमोर उघड केली असती. पण देवाला ते अतिशय काळजीपूर्वक करावे लागले कारण आदम देवावर पूर्णपणे अविश्वास आणि शंका बाळगत होता की देव त्याला खरोखर मदत करू इच्छितो का. आदमाचा तर्क असा होता की देवाने त्याला दोष दिला आहे आणि मृत्यू हाच एकमेव पर्याय आहे. हा विश्वास त्याच्या सर्व संततीत उतरला. देव एक दुष्ट सृष्टीकर्ता आहे आणि त्याच्यावर विश्वास ठेवू नये ही ग्नॉस्टिक वृत्ती आदमामध्येच होती आणि त्याच्या संततीमार्फत ती अधिक विस्तृत होत गेली.

## हुकुमनामानुसार हस्तलेखन नष्ट करणे

देव दोष देतो आणि मृत्यूची मागणी करतो असा विश्वास आदमामध्ये दृढ झाला, आणि यामुळेच आदमाने एक तृप्तीची व्यवस्था तयार केली. हे त्याच्या त्या कृतीत दिसते की त्याने अपराध हव्वेवर ढकलला आणि हव्वा निर्माण केल्याबद्दल देवाच्या पुत्रालाही दोषी धरले. जर कोणाला मरावे लागणार असेल, तर ते मरावे असा त्याचा विचार होता. काहीतरी मेल्याशिवाय आदमाला आपली क्षमा झाली आहे हे पटणारच नव्हते. याच कारणास्तव देवाने बलिदान व्यवस्था स्थापन केली म्हणजे आदमाच्या या मानसिक गरजेसाठी एक मार्ग उपलब्ध व्हावा, ज्यायोगे त्याला विश्वास बसेल की त्याला क्षमा प्राप्त झाली आहे. आपल्याला हे समजते की ही गरज आदमाची होती, देवाची नव्हती, कारण बायबल सांगते: “तू होमबली आणि अर्पण यांची इच्छा धरली नाहीस.” स्तोत्र ४०:६; इब्री १०:६

ही संपूर्ण संकल्पना कलस्सैकर २:१४ या अत्यंत गैरसमज झालेल्या वचनाशी संबंधित आहे:

“आपल्याविरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकूल असलेले विधींचे ऋणपत्र त्याने खोडले व वधस्तंभाला खिळून त्याने ते रद्द केले.” कलस्सैकर २:१४

बहुतेक ख्रिस्ती याचा अर्थ असा घेतात की देवाचा किंवा मोशेचा कायदा त्याने क्रूसावर खिळले. परंतु देवाचा कायदा आपल्याविरुद्ध आहे का? तो पापी मनुष्याच्या मनात विरोधात वाटतो कारण तो कायदा आपल्यासाठी लाभदायक, आरोग्यदायी आणि रक्षण करणारा आहे हे पापी मन पाहू शकत नाही. त्यांना देवाचा कायदा लादलेला, मनमानी, आणि विश्वाच्या रचनेचा आवश्यक भाग नव्हे असे वाटते. जो मनुष्य असे मानतो की कायदा मनमानी आहे, ते तो भयामुळे पाळतो तर जीवनासाठी आवश्यक आहे म्हणून नव्हे. हे त्या मुलासारखेच आहे जो भाजी खातो कारण पालक शिक्षा करतील अशी भीती असते, भाजी आरोग्यासाठी चांगली आहे हे त्याला कळलेले नसते. पापी मन प्रेमळ देवाच्या जीवनाच्या नियमांना एका दुष्ट देवाच्या मृत्यूची आज्ञा बनवते. देवाच्या नियमांवर संताप करणे म्हणजे गुरुत्वाकर्षणावर किंवा पाणी पिण्याच्या आवश्यकतेवर संताप करण्यासारखेच आहे.

कलस्सैकरमधील हा विभाग आपण नियमशास्त्रा विषयीच्या आपल्या वैरभावना बाजूला ठेवून पाहिला पाहिजे. असे केल्यावर आपल्याला दिसते की कलस्सैकर २:१४ मधील ऋणपत्र या शब्दासाठी ग्रीकमधील शब्द dogma आहे ज्याचा अर्थ आज्ञापत्र/फरमान आणि तो मनुष्यांच्या आदेशांशी संबंधित आहे, देवाच्या नाही.

“त्या दिवसांत असे झाले की, सर्व जगाची नावनिशी लिहिली जावी अशी कैसर औगुस्त ह्याची आज्ञा झाली." लूक २:१

“तेव्हा त्यांनी नगरांमधून जाता जाता यरुशलेमेतील प्रेषित व वडील ह्यांनी जे ठराव केले होते ते त्यांना पाळण्यास नेमून दिले.” प्रेषितांची कृत्ये १६:४

“त्यांना यासोनाने आपल्या घरात घेतले आहे, आणि हे सर्व जण कैसराच्या हुकमांविरुद्ध वागतात, म्हणजे येशू म्हणून दुसराच कोणी राजा आहे असे म्हणतात.” प्रेषितांची कृत्ये १७:७

सेप्टुआजिंटमध्ये, म्हणजे ग्रीक जुन्या करारात, dogma हा शब्द कधीही मोशेच्या नियमशास्त्रासाठी वापरलेला नाही. तो नेहमी मनुष्यांनी केलेल्या आज्ञापत्रांसाठीच वापरलेला आहे. उदाहरणे:

• एज्रा ६:८ मध्ये यहूदी नेत्यांना मंदिर बांधण्यासाठी मदत करण्याबद्दल सायरसचे आज्ञापत्र

• दानीएल २:१३ मध्ये ज्ञानी पुरुषांना मारण्याचे आज्ञापत्र

• दानीएल ३:१० मध्ये संगीत वाजताच मूर्तीची उपासना करण्याचे आज्ञापत्र

• दानीएल ६:१५ मध्ये मेड आणि फारस्यांच्या न बदलता येणाऱ्या आज्ञा

ॲडव्हेंटिस्ट संशोथकांनी नेहमीच समजले होते की कलस्सैकरातील “विधींचे ऋणपत्र” म्हणजे विधी अथवा सण-यज्ञाशी संबंधित कायदा. प्रश्न असा आहे की कोणता कायदा विधी आहे? “तू आपल्या शेजाऱ्यावर स्वतःसारखे प्रेम कर” (मत्तय १९:१९) हा नियम मोशेच्या नियमशास्त्रात आहे, दहा आज्ञांमध्ये नाही.

मग हा विधी आहे काय? नाही. दहा आज्ञांबाहेरील प्रत्येक कायदा विधी आहे ही कल्पना अत्यंत गंभीर व चूकीची आहे.

विधी म्हणजे फक्त बलिदान व्यवस्था. “बैल आणि बकऱ्यांचे रक्त” (इब्री १०:४) ही देवाची जबरदस्ती नव्हती तर मानवाच्या त्या मानसिक गरजेमुळे दिलेली वेदनादायी मुभा होती काहीतरी मेल्याशिवाय देव माझ्यासाठी कठोर आणि शाप देणारा नाही हे मानव मानू शकत नव्हता. देव मनुष्याला हे समजवू इच्छित होता की पापाचा परिणाम म्हणजे मृत्यू.

देवाला हवे होते की बलिदानांद्वारे आपण आपली अवस्था जाणून घ्यावी आणि पाप देवपुत्राच्या हृदयात कशी वेदना निर्माण करते, आणि तो पापाचा भार उचलतो जेणेकरून आपण पश्चात्तापाची संधी मिळेल. जेव्हा आपल्याला पापाचा आतील, आध्यात्मिक अर्थ कळू लागला, देवाची तारणयोजना समजली आणि देवाविषयीची आपली गैरसमजूत दूर झाली, तेव्हा आपल्याला यज्ञांची गरज राहिली नसती. मग आपण विश्वास ठेवू शकलो असतो की काहीतरी मरावे लागते म्हणून नव्हे तर थेट देवाकडे जाऊन क्षमा मागणे शक्य आहे. आपली भयंकर अवस्था आणि आपल्या पित्या-विरुद्धची अविवेकी वैरभावना अखेर उघड होते आणि आपण ती स्वीकारतो. आणि मग आपण देवाकडे येतो "तुटलेल्या आणि खेदग्रस्त हृदयाने" विश्वास ठेवून की देव "अशा हृदयाला तू तुच्छ मानणार नाही."

"यज्ञपशू व अन्नार्पण ह्यांत तुला संतोष नाही; तू माझे कान उघडले आहेस; होम व पापाबद्दल अर्पण ही तू मागत नाहीस." स्तोत्र ४०:६

"तुला पशुयज्ञ आवडत नाही, नाहीतर तो मी केला असता; होमबलीही तुला प्रिय नाही. देवाचे यज्ञ म्हणजे भग्न आत्मा; हे देवा, भग्न व अनुतप्त हृदय तू तुच्छ मानणार नाहीस." स्तोत्र ५१:१६–१७

"मी यज्ञाचा नाही तर दयेचा भुकेला आहे; होमार्पणांपेक्षा देवाचे ज्ञान मला आवडते." होशेय ६:६

पाप टाकण्याची आणि देवाला तृप्त करण्यासाठी केलेल्या ही मानव-निर्मित व्यवस्था आणि त्यासोबत असणारी देवाबद्दलची शत्रुत्वपूर्ण शंका घेणारी मानसिकता हीच क्रूसावर खिळली गेली. देवाने आपला पुत्र आपल्यासाठी पाप बनू दिला (२ करिंथ ५:२१) जेणेकरून आपल्याला आपले पाप इतरांवर टाकण्याची गरज उरू नये कारण पाप आधीच त्याच्या पुत्रावर ठेवले गेले होते. ख्रिस्ताद्वारे आपण शेवटी आपल्या समस्येशी सामोरे जाऊ शकतो, दोष इतरांवर टाकण्याऐवजी. आपण हव्वेवर दोष टाकणाऱ्या आदमासारखे राहण्याची

आवश्यकता उरली नाही.

मंदिरातील बलिदाने आणि सेवाक्रिया निर्दोष कोकरू असलेल्या ख्रिस्ताच्या परिपूर्ण अर्पणाने समाप्त होणार होत्या. ही बलिदाने क्रूसावर रद्द झाली. आपल्या प्रभूने ह्या विधींचे ऋणपत्र पुसून टाकले, बाजूला केले आणि त्याच्या क्रूसावर खिळले. {Ms 43, 1887, par. 1}

## नियमशास्त्र आपल्या फायद्यासाठी देण्यात आले

मानव पापाच्या प्रभावाखाली असल्यामुळे देवाच्या नियमाकडे नेहमी एक निष्ठेची परीक्षा म्हणून पाहतो, म्हणजे आपण काहीतरी करून देवासमोर सिद्ध व्हायचे आहे असा गैरसमज करतो. पण नियम हे प्रत्यक्षात देवाच्या वचनांवर विश्वास ठेवल्यास तो आपल्या आत करणारी कृती आहे, हे आपल्याला दिसत नाही.

मनुष्याला समजत नाही की नियम आध्यात्मिक आहे आणि तो आपल्या हृदयावर लिहिला जाणार आहे; नियम म्हणजे देवाचा स्वभाव आपल्या जीवनात प्रकट होणे. याउलट आपण फक्त नियमाचे अक्षरच पाहतो ज्याला आपण कधी अशक्य मानतो किंवा त्याच्या मागण्या कमी करण्याचा प्रयत्न करतो.

येशूने परूशांना शिकवण्याचा प्रयत्न केला की नियमाचा आत्मा महत्त्वाचा आहे, नुसते अक्षर नव्हे, जे ते इतरांना दोषी ठरवण्यासाठी वापरत होते. परूश्यांनी येशूच्या उपाशी शिष्यांनी शब्बाथ दिवशी धान्य तोडल्याबद्दल त्यांना दोष दिला, परंतु येशूने दाखवून दिले की नियमाचा वापर असा करायचा नाही.

“त्या वेळी एका शब्बाथ दिवशी येशू शेतामधून गेला; तेव्हा त्याच्या शिष्यांना भूक लागली होती, म्हणून ते कणसे मोडून खाऊ लागले. हे पाहून परूशी त्याला म्हणाले, “पाहा, शब्बाथ दिवशी जे करू नये ते आपले शिष्य करीत आहेत.””

मत्तय १२:१–२

सर्व मनुष्य पापी आहेत, परंतु स्वतःला पापी म्हणून स्वीकारण्याऐवजी आपण दोष इतरांवर ठेवून स्वतःची सुटका करून घेतो. परूश्यांनी केलेल्या नियमांच्या वाढीव तरतुदींनी हेच केले त्यांना इतरांवर दोष टाकता आला आणि त्याद्वारे स्वतःला धार्मिक समजता आले. येशूने हे उघड केले:

"'मला दया पाहिजे, यज्ञ नको', ह्याचा अर्थ तुम्हांला समजला असता तर तुम्ही निर्दोष्यांना दोष लावला नसता." मत्तय १२:७

देवाची इच्छा अशी नव्हती की ते लोकांना दोषी ठरवणारे आणि त्यांना बलिदान म्हणून सादर करणारे ठरावेत, तर ते दयेसाठी विनंती करणारे, आपल्या बांधवांसाठी मध्यस्थी करणारे याजक ठरावेत. नियमाचा उपयोग कसा करायचा याविषयीची ही गफलत आदमाकडून आलेली मानवाची वारसा व चूक होती. मनुष्य देवाला असा म्हणून पाहतो की तो नियम तोडणाऱ्याला दोष देतो आणि त्यामुळे देवाचे अनुयायीही तसेच करतात.

याहून खोलवर आणि कदाचित जाणीवपूर्वक आदमाने देवाला एक निर्दयी "निर्माता" म्हणून दोषी ठरवले, जेव्हा खरी गोष्ट अशी होती की देव पूर्णपणे निरपराधी होता. येशू येथे शिकवत आहे की देवाची खरी इच्छा अशी आहे की आपण मानवाला देवाशी आणि त्यामुळे देवाच्या नियमाशी मेळ घालून देऊ. जर आपण खरच विश्वास ठेवला असता की देवाला दया हवी आहे, बलिदान नव्हे, तर आपण पाहू शकलो असतो की देव सदैव क्षमा करण्यास आणि आपल्याला मदत करण्यास तयार आहे. येशू परूश्यांच्या दृष्टिकोनापेक्षा पूर्णपणे भिन्न असा नियमाचा अर्थ स्पष्ट करीत होता.

नियमाने आपल्याला वैयक्तिकरीत्या खिन्न करून ख्रिस्ताकडे आणायचे होते. त्याने आपली समस्या आपल्याला दाखवायची होती. परंतु नियमाचा उपयोग दुसऱ्यांपेक्षा आपण चांगले आहोत हे सिद्ध करण्यासाठी करायचा नव्हता.

नियमाचा हा गैरवापर झाल्यामुळे अनेक जण नियमाचा तिटकारा करायला लागतात. पापी मन असताना आपल्याला देवाची कृपाशीलता दिसत नाही, आणि त्यामुळे नियम अशक्य वाटतो, म्हणून तो आपल्याला मारण्यासाठीच बनवला आहे असे वाटते. यालाच पापाचा फसवा स्वरूप, पापाची अत्यंत पापीपणा म्हणता येईल, ज्याचा उलगडा देव आपल्याला करून द्यायला इच्छितो. येथे ई. जे. वॅगोर्नर पौलाच्या वचनांचे असे स्पष्टीकरण करतो:

रोमकर ७:११–१४ “कारण पापाने आज्ञेच्या योगे संधी साधून मला फसवले व तिच्या योगे मला ठार केले. तरीपण नियमशास्त्र पवित्र आहे, आणि आज्ञा पवित्र, यथान्याय व उत्तम आहे. तर मग जे उत्तम ते मला मरण असे झाले काय? कधीच नाही! पाप ते पापच दिसावे, म्हणून जे उत्तम त्याच्या योगे ते माझ्या ठायी मरण घडवणारे असे झाले, आणि आज्ञेच्या योगे पाप पराकाष्ठेचे पापिष्ट व्हावे म्हणून असे झाले. कारण आपल्याला ठाऊक आहे की, नियमशास्त्र आध्यात्मिक स्वरूपाचे आहे; मी तर दैहिक, पापाला विकलेला असा आहे.”

नियम निर्दोष आहे. नियमाने दाखवले की पाप आपल्याला मारत आहे. “म्हणून नियम पवित्र आहे आणि आज्ञा पवित्र, न्यायी आणि चांगली आहे.” आपल्याला नियमाविरुद्ध संताप करायचे काहीच कारण नाही जसे एखादा माणूस आपल्याला सांगतो की आपण जे अन्न समजून खात आहोत ते प्रत्यक्षात विष आहे. तो आपला शत्रू नाही; तो आपला मित्र आहे. तो आपल्याला धोका दाखवतो; जर त्याने तो इशारा दिला नसता तर तो आपला मित्र ठरला नसता. तो विषामुळे झालेला आजार बरा करू शकत नाही म्हणून तो कमी मित्र होत नाही. त्याने फक्त आपल्याला जागृत केले की आपण आता वैद्याकडून मदत घेऊ शकतो. म्हणून नियम स्वतः आपल्यासाठी मृत्यू नव्हता, तर त्याची भूमिका अशी होती की “आज्ञेमुळे पाप अत्यंत पापी व्हावे.”

“नियम आध्यात्मिक आहे.” “कारण आपण जाणतो की नियम आध्यात्मिक आहे.” जर हा तथ्य अधिक व्यापकपणे मान्य केला गेला असता, तर ख्रिस्ती

राष्ट्रांमधील तथाकथित धार्मिक कायदा करण्याची प्रवृत्ती खूपच कमी झाली असती. लोकानीं देवाच्या आज्ञा जबरीने लागू करण्याचा प्रयत्न केला नसता. नियम आध्यात्मिक असल्यामुळे तो केवळ देवाच्या आत्म्याच्या सामर्थ्यानेच पाळता येतो. “देव आत्मा आहे” (योहान ४:२४); म्हणून नियम देवाच्या स्वभावाचेच स्वरूप आहे. “आध्यात्मिक” हे “देहस्वभावी” किंवा “शारीरिक” याच्या विरुद्ध आहे. म्हणूनच देहस्वभावात असलेला मनुष्य देवाला संतोष करु शकत नाही. {ई. जे. वॅगोर्नर, द प्रेझेंट ट्रुथ, २२ नोव्हेंबर १८९४}

इस्राएली लोक देवाबद्दलच्या त्यांच्या चुकीच्या कल्पना धरूनच नियमशास्त्र स्वतः पाळून दाखवू पाहत होते. नियम किती व्यापक आहे आणि फक्त ख्रिस्त आपल्या आत वास करतो तेव्हाच ते पूर्ण होऊ शकते, हे त्यांना दिसत नव्हते. त्यांना हे उमजत नव्हते की “नियमशास्त्र ख्रिस्ताकडे नेणारा आपला गुरू होता, जेणेकरून आपण विश्वासाने धर्मी ठरू.” (गलती ३:२४) देवाची इच्छा अशी होती की इस्राएली लोकांनी ख्रिस्ताचा स्वीकार करावा आणि त्यांच्या पित्याप्रमाणे म्हणजे अब्राहामप्रमाणे विश्वासाने धर्मी व्हावे, आणि “देवाचा मित्र” व्हावे (याकोब २:२३). परंतु तसे झाले नाही. यहूद्यांच्या मनात देवाचे तेच चित्र होते जे आदमाने मनात धरले होते.

“आणि मोशेला म्हणाले, “आमच्याशी तूच बोल, म्हणजे आम्ही ऐकू; देव आमच्याशी न बोलो, तो बोलला तर आम्ही मरू.” निर्गम २०:१९

देवाला दिसत होते की इस्राएली लोक दहा आज्ञांचा चुकीचा अर्थ लावतील. म्हणून देवाने नियम कसा पाळायचा याबद्दल अधिक तपशील देण्यासाठी अधिक नियम दिले. ते मोशेने नियमशास्त्राच्या पुस्तकात लिहिले आणि कराराच्या पेटीशेजारी, अति-पवित्र स्थानात ठेवले. हे नियम दहा आज्ञांमध्ये असलेल्या आध्यात्मिक तत्त्वांचे स्पष्टीकरण देण्यासाठी होते. पडलेल्या मानवाला दहा आज्ञांचे संपूर्ण, स्पष्ट आकलन व्हावे म्हणून हे मार्गदर्शक ठरले. मनुष्याने मेलमिलाप आणि आज्ञाधारकतेचे पूर्ण परिणाम स्वीकारण्यास नकार

दिल्यामुळे, नियमातील अधिक तपशील आवश्यक झाले ज्यायोगे आपल्या स्वभावातील अत्यंत पापीपणा प्रकट होईल आणि आपण त्यामुळे पश्चात्ताप करू (रोमकर ५:२०). याबद्दल प्रेरित लेखन म्हणते:

"प्रभुने आपल्या लोकांना फक्त दहा आज्ञांच्या वचनांवर सोडले नाही. देव जसा सांगेल तसे मोशेने न्याय आणि नियम लिहावेत कर्तव्यविषयी अतिशय सूक्ष्म सूचना ज्यायोगे दगडी पट्टीवर कोरलेल्या आज्ञांचे रक्षण होईल. अशा रीतीने प्रभुने चुकणाऱ्या मनुष्याला त्या पवित्र नियमाच्या कठोर आज्ञाधारकतेकडे नेण्याचा प्रयत्न केला, ज्याचा तो भंग करण्यास फारच प्रवृत्त असतो." {Signs of the Times, १७ जून १८८०, पॅरा १}

जर मनुष्याने आदामाच्या पतनानंतर त्याला दिलेला देवाचा नियम पाळला असता, नोहाने तो कराराच्या पेटीत जसा सांभाळला तसा जपला असता, आणि अब्राहामाने जसा तो आचरणात ठेवला तसा ठेवला असता, तर सुंतेच्या विधीची गरजच निर्माण झाली नसती. आणि अब्राहामाच्या संततीने त्या कराराचे पालन केले असते ज्याचे चिन्ह किंवा प्रतिज्ञा म्हणून सुंता देण्यात आली होती तर ते कधीही मूर्तिपूजेत गेले नसते, किंवा त्यांना मिसरदेशात जाण्याची परवानगी मिळाली नसती; आणि मग देवाने आपला नियम सिनाय पर्वतावरून जाहीर करणे, तो दगडी पट्ट्यांवर कोरणे, किंवा मोशेला दिलेल्या न्याय आणि आज्ञांमध्ये त्याचे रक्षण करण्यासाठी निश्चित निर्देश देणे, यांची गरजच पडली नसती. {Signs of the Times, १७ जून १८८०, पॅरा २}

मोशे देवाबरोबर पर्वतावर असताना हे न्याय आणि आज्ञा देवाच्या तोंडून ऐकून लिहीत होता. लोकांनी एकमेकांशी आणि परक्यांशी कसे वागावे याबद्दल दिलेले हे स्पष्ट निर्देश दहा आज्ञांच्या तत्त्वांना अधिक साधे आणि स्पष्ट रूप देतात, जेणेकरून ते चुकू नयेत. {Signs of the Times, १७ जून १८८०, पॅरा ३}

येथे एलेन व्हाईट स्पष्ट सांगते की मोशेला दिलेले हे न्याय आणि आज्ञा विधी नव्हते. त्यांचा हेतू दहा आज्ञा कशा पाळायच्या याबद्दल अधिक प्रकाश देणे हा

होता. आपल्या पापी स्वभावामुळे आपण देवाचा इतका गैरसमज करतो की आपल्याला या अतिरिक्त तपशीलांची गरज भासते “सुलभ आणि स्पष्ट रीतीने दिलेले, जेणेकरून ते चुकू नयेत.” एलेन व्हाईटची इतर लिखाणेही ह्याच उद्देशाची अनेक तत्त्वे दाखवितात आपल्याला नियमशास्त्राच्या आज्ञाधारकतेत परत आणण्यासाठी मदत करणे. जरी असे दिसते की दहा आज्ञांमध्ये अजून अधिक नियम वाढवले जात आहेत, प्रत्यक्षात ते दहा आज्ञांचे स्पष्टीकरणच आहे.

परंतु या व्यतिरिक्त आज्ञांनीही इस्राएलला पश्चात्तापापर्यंत आणले नाही. त्यांना अद्याप असे वाटत नव्हते की ते सर्वजण पापी आहेत आणि देवानेच त्यांच्यामध्ये नियम ठेवायला हवा. त्यांनी नवीन करारात प्रवेश केला नाही, आणि त्यामुळे त्यांपैकी कोणीच नियम पाळू शकत नव्हते. त्यांना ते उच्च बोलावणेही दिसले नाही जगासाठी देवाने त्यांना करायला सांगितलेले मेलमिलापाचे कार्य, म्हणजेच एक “याजकांचे राज्य” होणे त्यांना दिसले नाही.

तेव्हा मोशे देवाकडे वर गेला; आणि परमेश्वराने त्याला पर्वतातून हाक मारून सांगितले की, “याकोबाच्या घराण्याला हे सांग, इस्राएल लोकांना हे विदित कर. मी मिसऱ्यांचे काय केले ते व तुम्हांला गरुडाच्या पंखांवर बसवून मी आपणाकडे कसे आणले आहे हे तुम्ही पाहिले आहे; म्हणून आता तुम्ही खरोखर माझी वाणी ऐकाल आणि माझा करार पाळाल तर सर्व लोकांपेक्षा माझा खास निधी व्हाल, कारण सर्व पृथ्वी माझी आहे; पण तुम्ही मला याजकराज्य, पवित्र राष्ट्र व्हाल. हेच शब्द तू इस्राएल लोकांना सांग.” गणना १९:३-६

देवाने इस्राएली लोकांना गरुडाच्या पंखांवर उचलल्याप्रमाणे प्रेमळ पित्याप्रमाणे मिसरदेशातून बाहेर काढले होते; परंतु ते देवाला असा मानत होते की तो त्यांना मिसरदेशातून बाहेर आणून मारण्यासाठीच घेऊन आला आहे (निर्गम १४:११; १६:३; गणना १४:२; २०:४; २१:५). त्यांनी देवाला अगदी आदमाने जसे पाहिले तसेच पाहिले, आणि आदमाप्रमाणेच त्यांनी इतरांवर दोष टाकण्याची वृत्ती

स्वीकारली. ते अद्यापही दोषाच्या मनोवृत्तीमध्ये अडकले होते, पश्चात्तापाच्या मनोवृत्तीमध्ये नव्हते. हीच आपली मानवी वृत्ती आहे, आणि आपणही आपल्या दैहिक स्वभावात त्यांच्यासारखेच आहोत. वर दिलेला एलेन व्हाईटचा उतारा पुढे असे सांगतो:

"कारण त्यांनी माझे निर्णय पाळले नाहीत; माझे नियम टाकून दिले, माझे शब्बाथ भ्रष्ट केले, व त्यांचे डोळे त्यांच्या वडिलांच्या मूर्तींकडे लागले. तेव्हा जे चांगले नाहीत असे नियम मी त्यांना दिले, ज्यांनी ते जगायचे नाहीत असे निर्णय त्यांना दिले." (यहेज्केल २०:२४–२५) सततच्या आज्ञाभंगामुळे, परमेश्वराने त्याच्या नियमाच्या भंगाला दंड जोडले जे भंग करणाऱ्यासाठी चांगले नव्हते आणि ज्यायोगे तो आपल्या बंडात जगू शकणार नव्हता. {Signs of the Times, १७ जून १८८०, पॅरा ४}

जेव्हा लोकांनी त्या नियमाचा जो देवाने इतक्या तेजोमय महिमेत जाहीर केला होता त्याचा भंग केला, तेव्हा त्यांनी त्या महान नियमदात्याचा उघड तिरस्कार केला, आणि त्याची शिक्षा म्हणजे मृत्यू होते. {Signs of the Times, १७ जून १८८०, पॅरा ५}

मुक्त क्षमा ही मनुष्याच्या त्या हृदयाला परकी आहे जी ख्रिस्ताच्या आत्म्यास दूर सारते. मिसरदेशातून निघालेल्या यहूद्यांनी ख्रिस्ताला दूर सारले कारण त्यांना वाटले की ख्रिस्त त्यांना अरण्यात मारण्यासाठी नेतो आहे. देवाबद्दलचे त्यांचे सततचे नकारात्मक विचार की देवाच्या मनात त्यांच्यासाठी वाईट हेतू आहेत यामुळे त्यांच्या कठीण होत चाललेल्या हृदयावर देवाच्या आत्म्यास कार्य करणे कठीण झाले. त्या महान नियमदात्याचा उघड तिरस्कार पाहून देवाला त्यांना अशी दगडी न्यायव्यवस्था द्यावी लागली की जी त्यांच्या दगडासारख्या हृदयाला तरी स्वीकारण्याजोगी वाटेल; अन्यथा तो न्याय त्यांना अन्यायकारक वाटला असता आणि देव अन्यायी आहे असे त्यांनी मानले असते. भंग करणाऱ्याचा मृत्यू त्यांना असे वाटू देत होता की त्यांची क्षमा झाली आहे आणि

देवाशी त्यांचा मेलमिलाप झाला आहे जसे आदमाला एखाद्या कोकराच्या मृत्यूमुळे स्वतःला क्षमा मिळाल्याची आणि देवाशी मेळ बसल्याची भावना झाली होती.

## आपल्या आज्ञांमुळे मळीन झालेले

पाप करणाऱ्याला मरण येणे ही जी मानवी गरज होती, ती इस्राएलच्या नागरी न्यायव्यवस्थेतील कठोर शिक्षांमध्ये प्रकट झाली जिथे दगडफेक ही शिक्षा होती आणि ही शिक्षा इस्राएलाने मिसरदेशात शिकली होती (निर्गम ८:२६).

